**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २९७/२०२२ मधील निशाणी ३६ आणि ३७ खालील आदेश.</u>**

१. निशाणी ३६ वरील अर्ज वादीने वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीर माफी साठी दाखल केलेला आहे व निशाणी ३७ वरील अर्ज अबेटमेंटच सेटअसाईड साठी व वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. वादी लक्ष्मी रमेश नलवडे या दिनांक ०४/०१/२०२३ रोजी मयत झाल्या. त्यामुळे त्यांच्या वारसांना याकामी समाविष्ठ करणे आवश्यक आहे. वादींना वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. वादी यांनी सदरचा विलंब हा जाणुन बुजुन केलेला नाही. त्यामुळे वादी यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवुन वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती वादी तर्फे करण्यात आली.

३. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविला व अर्जातील कथने संपुर्णपणे नाकारलेली आहेत. प्रतिवादींच्या मते अर्जात दिलेले कारण हे संयुक्तीक नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्ज वाचला, प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीचे दाखल कागदपत्रावरुन वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचा मृत्यु दिनांक

०४/०१/२०२३ रोजी झाल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचे प्रकरण हे वादींनी वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेले आहे. त्यामुळे वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारसांना सदर प्रकरण चालविण्याचा अधिकार पुढे चालु राहतो. प्रस्तुत प्रकरणात वादीने केलेल्या कथनांवरुन त्यास मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले आहे. सदर नमूद कारणामध्ये तथ्य दिसुन येते. वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्यासाठी वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ३६ आणि ३७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे विरुध्द झालेला अबेटमेंन्टचा अर्ज रद्द करण्यात येतो.

३. वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस रेकॉडवर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो.

४. वादी यांनी निशाणी ३७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वादी लक्ष्मी रमेश नलवडे यांचे वारस रेकॉर्डवर घ्यावेत व त्या अनुशंगाने अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

ATUL BHIMRAO PATIL

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2023.07.06 13:25:21 +0530

कोरेगाव.

दि. २१/०६/२०२३

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.